# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक १८ ऑगस्ट, २०२२

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : मंत्र्यांचा परिचय.**

**दोन : नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय.**

**तीन : प्रश्नोत्तरे.**

**(क) तारांकित प्रश्न.**

**(ख) अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी, अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी, पंधरावी, सोळावी, सतरावी, अठरावी, एकोणीसावी, विसावी व एकविसावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**पाच : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **श्री.राजहंस सिंह, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अमरावती शहरातील तहसिल कार्यालयासमोरच्या रचना श्री मॉलमधील अमित मेडिकलचे संचालक उमेश कोल्हे यांचा दिनांक २१ जून, २०२२ रोजी रात्री गळयावर चाकूने वार करुन खून करण्यात आला असणे, सोशल मिडियावर नूपूर शर्माच्या समर्थनार्थ पोस्ट केल्याने सदर व्यवसायिकाची हत्या करण्यात आल्याचा खळबळजनक खुलासा शहर पोलिसांनी केला असणे, सदर हत्येप्रकरणी सात जणांना अटक करण्यात आली असणे, हत्याकाडांचा मुख्य सुत्रधार असलेल्या शेख इरफानच्या "रहेबर" या संस्थेला कोरोना काळात ४० ते ४५ लाखाचे फंडिग झाले असणे, सदर निधी अमरावती, राज्य, देश वा देशाबाहेरून मिळाला का? या पैशाचे बॅकिंग झाले का? या पैशाचे ऑडिट कोणी केले? याबाबत तपास करणे गरजेचे असणे, सर्वसामान्य नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण होत असल्यामुळे राज्यात अशा घटना पुन्हा होऊ न देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

अप्रकाशित प्रत

**(२)** **सर्वश्री विलास पोतनीस,** सुनिल शिंदे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"जालना येथील स्टील उद्योगांनी राज्य शासनाची कोट्यवधी रुपयांची सबसिडी लाटल्याचे प्रकरण दि. १२ ऑगस्ट, २०२२ रोजी उघडकीस येणे, जालना येथील या स्टील कंपनीला महावितरणकडून नियमबाह्य पद्धतीने अनुदान देण्यात येणे, मेसर्स कलिका स्टील जालना प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने नवीन कंपनी या नात्याने उद्योग विभागाच्या योजनेनुसार महावितरणकडून वीज देयकांत अनुदान अर्थात सवलतीसाठी अर्ज केला असणे, हे अनुदान मर्यादित कालावधीसाठीच असणे, अनुदानाची मर्यादा संपल्यानंतर मात्र कंपनीने नाव बदलून गजकेसरी स्टील ॲण्ड अलॉय प्रायव्हेट लिमिटेड, असे करणे, या नव्या नावासह कंपनीने पुन्हा एकदा वीज देयकांत अनुदानासाठी अर्ज करणे, महावितरणने प्रमाणपत्राची कुठलीही खातरजमा न करता या नव्या नावाच्या कंपनीला दरमहा सरसकट एक कोटी रुपयांचे अनुदान देण्यास सुरुवात करणे, या संदर्भात मुंबईच्या कंपनी नोंदणी कार्यालयातील दस्ताऐवजानुसार मेसर्स कलिका स्टील जालना प्रायव्हेट लिमिटेडने त्यांचे नाव बदलून गजकेसरी स्टील ॲण्ड अलॉय प्रायव्हेट लिमिटेड केल्याचे स्पष्ट होणे, यात महावितरणाचे व पर्यायाने राज्य सरकारी महसूलाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असणे, यास्तव सदरहू घोटाळ्याची सखोल चौकशी करून महावितरणच्या दोषी अधिकाऱ्यांसह संबधित कंपन्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(३)** **श्री.बाळाराम पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रायगड जिल्हयातील खालापूर तालुक्यातील रसायनी परिसरातील ८ गावांच्या १६०० एकर जमिनीचे संपादन केंद्र सरकारच्या बेसिक केमिकल्स अँड इंटरमेडिएट प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाकडून करण्यात येणे,संपादित एकूण १६०० एकर पैकी ५३९ एकर जमीन इतर प्रकल्पांना (HIL, MIDC, MAIDC, MSEB & amp; OTHER) वर्ग करण्यात येऊन उर्वरित १०६१ एकर जमीन HOC आस्थापनेच्या नावे राहणे, पैकी उर्वरित ५०० एकर जमीन फक्त कारखाना व कामगार वसाहतीकरीता वापरण्यात येणे, उर्वरित ५६१ एकर जमीन ही शेतकऱ्यांच्या ताब्यात वहिवाटीत आज देखील असणे, सन २०१७-१८ मध्ये HOC या आस्थापनेस आर्थिक नुकसान पोहोचल्यामुळे सदर जमीन

अप्रकाशित प्रत

विक्रीस काढणे, या जमीन विक्रीस स्थानिक शेतकऱ्यांचा प्रखर विरोध असणे, एकूण संपादित जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना मिळावा तसेच स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या व गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करणेबाबत सकारात्मक चर्चा होऊन तत्कालिन मा.विभागीय आयुक्त,कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येणे, राज्य शासनाने HOC या आस्थापनेस जमीन विक्रीकरीता परवानगी दिल्याने शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असताना देखील पोलीस बळाचा वापर करून उक्त आस्थापनेने १.४२ कोटी प्रति एकर प्रमाणे ३७५ एकर जमीन विक्री करण्यात येणे, HOC या आस्थापनेच्या मनमानी कारभाराबाबत शेतकऱ्यांचा प्रखर विरोध असून शेतकऱ्यांच्या भावनांचा उद्रेक होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, याकरीता दिनांक १७ नोव्हेंबर २०२१ रोजी प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार १२.५ टक्के मोबदला/प्लॉट प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना एकूण १६०० एकर संपादित जमिनीवर मिळणे, गरजेपोटी गावालगत व विखुरलेली सर्व घरे नियमित करून आवश्यकतेनुसार पुनर्वसन नियमानुसार करणे,प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना बी.पी.सी.एल आस्थापनेत किमान ८० टक्के नोकरीत व इतर कंत्राटामध्ये प्राधान्य मिळणेबाबत तसेच आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही,उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री अमोल मिटकरी,** शशिकांत शिंदे, विक्रम काळे, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अकोला जिल्हयातील झुरळ (खुर्द) गांव अकोला शहरापासून ३० कि.मी. अंतरावर असणाऱ्या गावाची लोकसंख्या ४०० च्या आसपास असून, सदर गावांमध्ये पावसाळ्याचे चार महिने लोकांना जीवनमान जगणे अत्यंत जिकरीचे असल्याची परिस्थिती असणे, सदर गावांमध्ये ना रस्ता तसेच नदी पार करण्यासाठी पूल नसल्याने पावसाळ्याच्या दिवसांमध्ये शाळा, बाजारात, दवाखान्यामध्ये जाण्यासाठी गैरसोय होत असून जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याची घटना माहे १४ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असणे, मुलांना शिक्षण घेणे अवघड झालेले असणे, सहा वर्षापूर्वी श्री संतोष घारे या गावातील नागरीकाच्या मुलाला सर्पदंश झाला होता, परंतु नदीला पूर आल्याने वेळेत उपचार न मिळाल्याने मृत्यु झाल्याची घटना घडलेली असणे, नागरीकांनी रस्ता, पुलासाठी मतदानावर बहिष्कार हे अस्त्रही उपसले मात्र प्रत्येक वेळी

अप्रकाशित प्रत

याबाबत सन २००२ पासून मा.जिल्हाधिकारी, तहसिलदार यांना निवेदने देण्यात येऊनही त्याबाबत कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनांस येत असणे, मात्र अद्यापही नागरीकांना सदर मुलभूत सोयीसुविधांपासून वंचित राहावे लागत असणे, मोठया नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागत असणे, स्वातंत्र्यांचा ७५ वा अमृत महोत्सव साजरा होत असतांना सदर गावांमध्ये नागरीकांना अद्यापही मुलभूत गरजांपासून वंचित राहावे लागत असल्याचे चित्र असून ग्रामीण भागातील समस्या जैसे-थे असल्याचे वास्तव असल्याने नागरीकांच्या मनात शासनाप्रती तीव्र नाराजी व संतापाची भावना, याबाबत शासनाची भूमिका व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **डॉ.सुधीर तांबे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महिला व बालविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य शासनातर्फे कोरोना संसर्ग किंवा अन्य कारणामुळे दोन्ही पालक गमावलेल्या ० ते ८ वर्षे वयोगटातील अनाथ बालकांचे पुनर्वसन आणि त्यांच्या भवितव्यासाठी अर्थसहाय्य मदत दिली जात असणे, परंतु या मदतीपासून काही कोरोना अनाथ बालके वंचित असल्याचे उघडकीस येणे, ठाण्यातील ३६ कोरोना अनाथ बालके मदतीपासून वंचित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ च्या सुमारास निदर्शनास येणे, सबब आर्थिक सहाय्य मदतीपासून वंचित असलेल्या अनाथ बालकांना त्वरीत मदत मिळण्याबाबत करावयाची कार्यवाही याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका."

**सहा : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास).**

## - मध्यंतर –

**सात : सर्वश्री अंबादास दानवे**, अमरनाथ राजूरकर, ॲड.अनिल परब, सर्वश्री नरेंद्र दराडे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, राजेश राठोड, आमश्या पाडवी, विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री सतीश चव्हाण, विलास पोतनीस, सतेज उर्फ बंटी पाटील, सुनिल शिंदे, दुष्यंत चतुर्वेदी, अशोक उर्फ भाई जगताप, सचिन अहिर, अनिकेत तटकरे, मोहनराव कदम, अमोल मिटकरी, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री अरुण लाड, जयंत आसगावकर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"सन २०२२ च्या माहे जुलै-ऑगस्ट महिन्यात प्रामुख्याने विदर्भ व मराठवाड्यासह राज्यातील इतर भागात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली असून जिरायती व बागायती पिकांचे, घरांचे, पशुधनाचे नुकसान झाले

असणे तसेच सुमारे १२५ पेक्षा जास्त लोकांना आपल्या प्राणास मुकावे लागले असणे, विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ तसेच मराठवाड्यातील नांदेड, परभणी, हिंगोली व बीड आदी जिल्ह्यात सर्व पिके वाहून, कुजुन व सडून गेलेली असणे, सोयाबीन, कापूस व तूर सारख्या नगदी पिकांचे तसेच नगदी पिकांबरोबरच केळी, संत्रा व तत्सम फळपिकांचेही नुकसान झालेले असणे, राज्यातील काही भागात, विशेषत: बीड, उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यात सोयाबीन पिकावर गोगलगायीचा व हळदया (यलो मोझाक) प्रादुर्भाव झाला असून शासनाकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना न झाल्यामुळे सोयाबीन उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता असणे, पीक नुकसानी बरोबरच हजारो ठिबक व तुषार सिंचन संच वाहून गेले असून त्यात मातीचा गाळ जाऊन ते नादुरुस्त झालेले असणे, शासन निर्णयानुसार पुढील ७ वर्ष नवीन संच बसविण्यास अनुदान देय नसल्यामुळे शासनाने सदरची अट शिथिल करण्याची आवश्यकता असणे, अतिवृष्टीत राज्यातील हजारो हेक्टर शेतजमीन वाहून व खरडून गेल्याने त्या पुर्णपणे नापीक होण्याची भीती निर्माण झाली असणे, अनेक विहिरी गाळाने भरुन नादुरुस्त झाल्या असणे, मोठे ओढे व नदी नाले यांनी आपली पात्रे बदलल्याने काठावरील सुपीक जमीन नापीक झाली असणे, सततच्या व मोठ्या प्रमाणावर झालेल्या पावसाने काही जिल्ह्यातील पुलांचे तसेच पांदण रस्ते, ग्रामीण व प्रमुख जिल्हा मार्ग मोठ्या प्रमाणावर नादुरुस्त झाले असून मोठ्या खड्डयांमुळे अपघाताला सामोरे जावे लागत आहे व अनेक गावे अजुनही तालुक्याच्या प्रमुख गावाच्या संपर्कात आलेली नसणे, अनेक गावात विजेचे खांब अद्यापही पडलेले आहेत आणि ट्रान्सफॉर्मर व विद्युत वाहिन्या नादुरुस्त होऊन वीज वितरण व्यवस्था पुर्णत: कोलमडलेली असणे, परिणामी अनेक गावात अद्यापही वीज नसणे, पुराचे पाणी घरात शिरल्याने घरांची, गोठ्यांची, दुकानांची, टपऱ्यांची मोठया प्रमाणावर पडझड होऊन संबंधितांचे नुकसान झाले असणे, बराच काळ पाणी घरात राहिल्याने काही घरे पुर्णपणे ढासळलेली असून गाई-गुरांसह इतर पशुधन पाण्यामध्ये वाहून गेलेले असणे, मजुरांना या सर्व काळात व पुढील काही काळ मजुरी मिळणार नसल्यामुळे विशेष बाब म्हणून मजुरांना त्यांच्या झालेल्या नुकसानीसाठी आर्थिक मदत करण्याची आवश्यकता असणे, शासनाने तातडीने लक्ष न दिल्याने नाउमेद होऊन अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या असणे, अनेक भागातील धरणे पूर्ण क्षमतेने भरुन ओसंडून वाहत असून पूरपरिस्थिती निर्माण झाली असणे, परिणामी या भागातील ठिकाणांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असणे, जलसंपदा विभागाने आताच पूर परिस्थिती

अस्वीकृत पत्र

नियंत्रणाचे नियोजन करणे आवश्यक असणे, तसेच कोकणामध्ये ऐन लावणी करण्याच्या वेळी जवळपास १५ दिवस पाऊस नसल्याने भात व नागली पिकाची रोपे सुकून जाणे, तर महाराष्ट्रातील काही भागामध्ये पर्जन्यमान कमी असल्याने झालेली पिकांची हानी व संभाव्य पाणीटंचाई निर्माण होणे, एकंदरीतच विदर्भ, मराठवाडा व इतर विभागातील अतिवृष्टीमुळे पिके, फळपिके, शेतजमीनी, रस्ते, विजव्यवस्था, घरे यांच्या नुकसानीसाठी शासनाने जाहीर केलेली मदत अत्यंत तुटपुंजी असून अनेक घटकांचा त्यात समावेश झालेला नसणे, अतिवृष्टी भागात अद्यापही रु.५० हजार सानुग्रह अनुदानाचे वाटप न करणे, शासनाने कोरडवाहूसाठी हेक्टर ७५ हजार रुपये तसेच फळपिकांसाठी हेक्टरी दीड लाख रुपयांचे तसेच सर्व घटकांचा समावेश करुन त्यांना ठोस मदत जाहीर करण्याची आवश्यक असणे, शेतकऱ्यांनी खरीप हंगामाकरीता पीक कर्ज घेतलेले असून अतिवृष्टीमुळे कर्ज परतफेड करणे त्यांना शक्य नसणे, या हंगामासाठी घेतलेल्या कर्जाची माफी करण्याची लोकप्रतिनिधींची व शेतकऱ्यांचीही आग्रही मागणी असणे, तथापि, शासनाकडून याबाबत दुर्लक्ष होत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेली तीव्र नाराजी, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**आठ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

**(मंगळवार, दिनांक १६ ऑगस्ट, २०२२ रोजी बॅलटद्वारे काढण्यात आलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक १]**

(१) **सर्वश्री गोपिचंद पडळकर,** रामराव पाटील, रमेश कराड **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"बेरड, बेडर रामोशी समाजाचे देशभक्तीचे प्रतीक असलेल्या गुप्तहेर बर्हिजी नाईक यांचा बानूरगड येथील समाधी परिसर तसेच आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांचे फाशीचे ब्रिटिशकालीन ठिकाण असलेल्या पुण्यातील स्मारक परिसराचा विकास करणे, विमुक्त जाती (VJ) मधील रिक्त पद ' क ' व ' ड ' मध्ये न भरता विमुक्त जाती (VJ) साठी अनुशेष राखून ठेवणे, बेरड रामोशी समाजाचा anthropological परीक्षण (survey) (सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, खानेसुमारी इ. विषयी) BARTI, टाटा इन्स्टिटयूट या सारख्या संस्थांकडून करणे, बेरड रामोशी समाजाला घटनात्मक ST चे आरक्षण मिळणे इ. मागण्यांबाबतचे निवेदन आद्य क्रांतिवीर उमाजी नाईक क्षेत्रीय सोमवंशी संघटना महाराष्ट्र राज्य, पुणे, यांनी दिनांक २३ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनास

अस्वाक्षरित प्रत

दिलेले असणे, स्वातंत्र्यलढ्यात सर्वप्रथम फासावर गेलेले क्रांतिवीर उमाजी नाईक यांना 'आद्यक्रांतिवीर उमाजी नाईक ' संबोधण्यात यावे ही मागणी सामान्य प्रशासन विभागाला दिनांक २६ जुलै, २०२२ रोजी सदर संघटनेने केलेली असणे, उक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासनाकडून आजमितीस कोणतीही कार्यवाही केली नसणे, उक्त मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी बॅलटद्वारे काढण्यात आलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक २]**

**(२)** **सर्वश्री गोपिचंद पडळकर**, रमेश कराड, रामराव पाटील **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"चिखली (जि.बुलढाणा) नगरपालिका कार्यक्षेत्रात पुंडलिक नगर येथे करोडो रुपयांची कामे सुरु असणे, सदरहू कामे बोगस व निकृष्ट दर्जाची झालेली असणे, सदरहू ठिकाणची कामे १० ते २०% झाली असतांनाही मुख्याधिकारी व शाखा अभियंता यांनी संगनमताने ४५ लक्ष रुपयांचे देयक काढले असल्याचे माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, निकृष्ट दर्जाच्या कामासंदर्भात नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधीनी प्रशासनाकडे अनेक तक्रारी केलेल्या असणे, सदरहू कामांची तसेच इतरही बांधकामांची उच्चस्तरीय चौकशी करुन दोषी मुख्याधिकारी व शाखा अभियंता यांना निलंबित करण्याची मागणी श्री.प्रकाश इंगळे रा.चिखली, जि.बुलढाणा यांनी दिनांक ६ जुलै, २०२२ रोजी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे पत्राद्वारे केली असणे, सदरहू मागणीच्या अनुषंगाने संपूर्ण कामांची चौकशी करुन संबंधित जबाबदार दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

अप्रकाशित प्रत

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : १७ ऑगस्ट, २०२२

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

अप्रकाशित प्रत